# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-१२१** **दिनांक - २८/०३/२०२४**

**भाईंदर येथील मोबाईल दुकान फोडुन त्यातुन १६,७१,३००/- रुपये किमतीचे मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीतास १४,५६,३००/- मुद्देमालासह दिल्ली येथुन अटक करण्यात तसेच भाईदर येथुन चोरीस गेलेला टाटा एस. डंपर चोरी करणाऱ्या इसमाचा शोध घेवुन चोरी गेलेला ट्रक जालना येथुन हस्तगत करण्यात गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा यांना यश.**

----ooooo----

दिनांक २०/०३/२०२४ रोजी रात्रौ २२.०० वा ते दिनांक २१/०३/२०२४ सकाळी १०.०० वा चे दरम्यान यातील फिर्यादी नामे श्री चिराग जगदीश अनडा वय-३६ वर्षे, व्यवसाय मोबाईल शॉपी, रा. सी/६०४ मुकुंद कॉम्पलेक्स, न्यु गोल्डन नेस्ट रोड, बनाना लिफ्ट हॉटेलच्या पाठीमागे, भाईंदर पुर्व, ता.जि. ठाणे मो.नं. ९०२९१९९७२२ यांचे जे.जे. मोबाईल शॉप, ०१ अप्लेश बिल्डींग, खाऊ गल्ली स्टेशन रोड, भाईंदर पश्चिम येथुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे दुकानाचे पश्चिम भिंतीलगत असलेले लोंखडी ग्रील व प्लाय तोडुन त्यावाटे प्रवेश करुन सुमारे १६,७१,३००/- रुपये किंमतीचे नविन मोबाईल फोन घरफोडी चोरी केलेबाबत भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा रजी. नं. १३०/२०२४ भादवीस कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच दिनांक १२/०३/२०२४ रोजी १५.४५ वाजता ते दिनांक १३/०३/२०२४ सकाळी ०८.०० वा. दरम्यान भोलानगर जवळ, उत्तन ते भाईंदर पश्चिम येथुन फिर्यादी नामे सुरेश त्रिंबक मंजुरकर वय ३४ वर्षे धंदा - डम्पर चालक, रा घर नं. ३ , गंगाधर शेठ चाळ, गायमुख घोडबंदर रोड, ता. जि. ठाणे मुळ गाव - वरदरी बु. पोस्ट - जवळुका ता मालेगाव जि. वाशिम मो. ७७७६८८७२७१ यांचे मालकीचा ३,००,०००/-रु. किंमतीची एक टाटा एस डम्पर क्रमांक एम.एच./०४/सीयु/९९०७ कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन चोरुन नेले बाबत भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा रजी. नं. ११२/२०२४ भादवीस कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

मा. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा मार्फत समांतर तपास करीत असताना पडताळणी केलेल्या सीसीटीव्ही फुटेजचे आधारे तांत्रीक विश्लेषन करण्यात आले. त्यापासुन प्राप्त माहीती तसेच गुप्त बातमीदार याचे मार्फत मिळालेल्या माहितीवरुन सदरचा गुन्हा करणारा आरोपी फिरोज ऊर्फ मोनु खान रा. बांद्रा पश्चिम हा असल्याचे निष्पन्न झाले. त्याचे बाबत तपास करता तो बिजनौर, उत्तर प्रदेश येथे गेला असल्याचे समजल्याने पोलीस पथक रवाना करण्यात आले. तपासा दरम्यान आरोपीत दिल्ली येथे गेला असल्याची माहीती मिळाली. त्याप्रमाणे दिल्ली येथे जावुन पोलीस मदत मिळवून आरोपीत नामे फिरोज ऊर्फ मोनु नईम खान वय-२९ वर्षे, व्यवसाय बेकार मुळ रा. ग्राम अकबराबाद, तहसिल नजिबाबाद, बिजनौर, राज्य उत्तरप्रदेश यास ताब्यात घेवुन गुन्ह्यातील चोरी गेलेल्या २४ मोबाईल पैकी १४,५६,३००/- रुपये किमतीचे २२ मोबाईल हस्तगत

करण्यात आले आहेत. तसेच त्यांचेकडे केलेल्या चौकशी मध्ये त्याने नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजी. क्रमांक १६४/२०२४ भा.द.वि.स. कलम ३८०,४५७,३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच मा. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे ट्रक चोरीच्या गुन्हयाचे संदर्भाने तपासात सदर गुन्हयांचे घटनास्थळापासुन चोरी करणारा इसम सदर ट्रक घेवुन जात असलेल्या भाईंदर ते परभणी मार्गावरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करुन तांत्रीक विश्लेषन करुन गुन्हयांतील गेला डंपर क्रमांक एम.एच./०४/सीयु/९९०७ हिचा देवाशिष पेट्रोल पंप परभणी पर्यंत शोध घेतला. त्यानंतर सदर परिसरातील वाहन चोरीचे गुन्हे करणारे आरोपीतांची माहीती गोळा केली असता त्यातील आरोपीत नामे वैजनाथ लक्ष्मण लांडगे वय-६७ वर्षे, रा. साईबाबा नगर, परभणी यांचा संशय आल्याने तात्रीक विश्लेषण केले असता सदरचा गुन्हा त्यानेच केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीत वैजनाथ लक्ष्मण लांडगे याचा शोध घेतला असता त्याचा मोटार अपघात होवुन तो गंभीर जखमी झाल्याने परभणी येथे हॉस्पीटल मध्ये ॲडमीट आहे. आरोपीत याने सदरचा डंपर हा चंद्रकांत गणपतराव जाधव रा. जालना यांना विक्री केलेला असुन सदरचा डंपर हा हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.निरी अविराज कुराडे, सपोनिरी प्रशांत गांगुर्डे, सपोनिरी पुष्पराज सुर्वे, पो.उप-निरी. राजु तांबे, सफौ संदीप शिंदे, पोहवा/अविनाश गर्जे, पो.हवा/ संजय शिंदे, पोहवा/०००२३ संतोष लांडगे,पोहवा/०००२४ पुष्पेंद्र थापा, पो.हवा./ सचिन हुले, पोहवा/सचिन सावंत, पो.हवा./ विजय गायकवाड, पो.हवा/समिर यादव, पो.हवा./ सुधीर खोत, पो.हवा./ विकास राजपुत, पो.कॉ./ प्रशांत विसपुते, पो.कॉ./ सनी सुर्यवंशी, पोशि/गैरव बारी, पोशि/सौरभ इंगळे, पो.शि./ धिरज मेंगाणे, सफौज. सतोष चव्हाण सायबर विभाग यांनी केली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास भाईंदर पोलीस ठाणे मार्फत करण्यात येत आहे.




शुभ
MH-26
H-7964


MH-26
H7964